**पाहिजेत**
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**व्यवसाय**
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६२ वा | शुक्रवार, दि. २९ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ‘उष्माघातानं मेलो तर सरकार जबाबदार’

## ३० मे पासून मनोज जरांगे पाटील रणरणत्या उन्हात करणार बेमुदत उपोषण

**अंतरवाली (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेत, ३० मे पासून प्रखर उन्हात बेमुदत उपोषण करण्याची घोषणा केली आहे.

देशात कुठेच झालं नाही, असं कठोर उपोषण करणार असल्याचे स्पष्ट करतान जरांगे-पाटील यांनी ‘उष्माघातानं बळी गेल्यास त्याला सरकार जबाबदार असेल’, असा इशारा दिला. उपोषणादरम्यान, मराठा समाजातील बांधवांनी अंतरवाली सराटीकडे येऊ नये, असे आवाहन देखील जरांगे पाटील यांनी केले.

**३० मे पासून रणरणत्या उन्हात उपोषण : जरांगे-पाटील**

आगामी उपोषणाबाबत माहिती देण्यासाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीत पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली. यावेळी मंडपात उपोषण न करता प्रखर उन्हात उपोषण करण्याची आक्रमक भूमिक मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. ‘यावेळी ३० मे पासून रखरखत्या उन्हात उपोषण करणार आहे. उपोषणादरम्यान मेलो तर मेलो. उष्माघातानं बळी गेल्यास त्याला सरकार जबाबदार असेल. यावेळी सरकारचा नाही तर माझा तुकडा पडेल’, असे जरांगे पाटील म्हणाले.

**देशात यापूर्वी झाले नाही असं उपोषण होणार : जरांगे-पाटील**

‘उन्हात किती त्रास होईल याचा विचार करत नाही. एक तर सरकारचा तुकडा पडेल नाहीतर माझा, बाज टाकून रखरखत्या




उन्हात मी यावेळी उपोषण करणार आहे. पायात काही चप्पल नसेल, अन्नपाणी नसेल, काय व्हायचं होऊ. मराठा समाजातील मुलांचा सरकारने उन्हाळा केला आहे. मराठा समाजातील बांधवांनी उपोषणादरम्यान अंतरवाली सराटीकडे येऊ नये’, असे मनोज-जरांगे पाटील पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले. ‘देशात यापूर्वी अशा प्रकारचे, कठोर आणि इतक्या टोकाचे उपोषण झाल्याचे आठवत नाही. तेवढ्या टोकाचं हे उपोषण होईल’, असेही जरांगे पाटील म्हणाले.

**जरांगे-पाटलांनी उपस्थित केले काही प्रश्न**

मला चर्चा नको अशी भूमिका स्पष्ट करताना, ‘५८ लाख नोंदी निघाल्या त्यांना कुणबी प्रमाणपत्र देणार आहात का? कुणबी प्रमाणपत्र मिळालं त्यांना वैधता देणार आहात का? हैद्राबाद गॅझेटियरचा जीआर काढला त्याचे प्रमाणपत्र देणार आहात का? त्याची वैधता देणार का?’, असे सवाल जरांगे-पाटील यांनी उपस्थित केले. ‘मराठा आरक्षण देताय म्हणजे काय करताय? असा प्रश्न करत मराठा समाजाची मते हवीत पण आरक्षण द्यायला नको’, असेही जरांगे-पाटील म्हणाले.

**आरपारची लढाई करण्याची घोषणा**

तुमच्याकडून हल्ले केले जातात आणि आमच्याविरोधात गुन्हे दाखल केले जातात? सातारा संस्थानाचे गॅझेट लागू केले जात नाही? असा प्रश्नही जरांगे-पाटलांनी उपस्थित केले. मराठा-कुणबी मंत्रालय स्थापन करायाला किती वेळ लागतो? असा सवाल त्यांनी केला. आमचा पाच पिढ्यांचा बॅकलॉग कोण भरुन काढणार? असेही पाटील म्हणाले. यावेळी आरपारची लढाई करणार असल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले.

## आम्हीही सत्तेमध्ये आहोत, शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना कोणी दमबाजी केली तर खपवून घेणार नाही

### उदय सामंतांचा भाजपला टोला




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना कोणी दमबाजी करुन गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असलीत तर ते खपवून घेणार नाही. शिवसेना अशाने नामोहरम होणार नाही असा टोला मंत्री उदय सामंत यांनी भाजपला लगावला.

यावरुन शिवसेना आणि भाजपमधील वाद पुन्हा एकदा समोर आल्याचे दिसत आहे. सोमवार टू सोमवार मुंबईत येऊन दुकानदारी नको, असे म्हणत उदय सामंत यांनी पदाधिकाऱ्यांचेही कान टोचल्याचं पाहायला मिळालं.

**सोमवार टू सोमवार मुंबईला येऊन दुकानदारी करणे बंद करा**

अनिवासी भारतीय सारखे पदाधिकारी उपयोगाचे नाहीत. सोमवार टू सोमवार मुंबईला येऊन दुकानदारी करणे बंद करा. शिंदे साहेब हे कधीही खपवून घेणार नाहीत. कॅबिनेटमध्ये मंत्री बसतात की पदाधिकारी हा प्रश्न पडू लागला आहे अशा शब्दात उदय सामंत यांनी (पान 2 वर..)

## पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या- खा. प्रणिती शिंदे



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यात अचानक आलेल्या वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह झालेल्या जोरदार अवकाळी पावसामुळे अनेक गावांतील केळी बागांचे, फळबागांचे तसेच इतर शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी बांधवांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले असून अनेक ठिकाणी जनावरांचे गोठे, घरांची छप्परे आणि इतर मालमत्तेचेही नुकसान झाले आहे.

आज खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील नुकसानग्रस्त भागांना भेट देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. केळी बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. नुकसान होऊन पाच दिवस उलटून गेले तरी प्रशासनाकडून अनेक ठिकाणी पंचनामे करण्यात आले नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

मोहोळ तालुक्यातील विविध गावांमध्ये केळी बागा पूर्णपणे जमीनदोस्त झाल्या, तसेच मालमत्तेचेही नुकसान झाले असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना भरीव नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली.

या कठीण प्रसंगी मतदारसंघातील प्रत्येक शेतकरी आणि नागरिकांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत. संबंधित सर्व प्रशासकीय यंत्रणेला तात्काळ सतर्क राहून प्रत्यक्ष पाहणी व पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, नुकसानग्रस्तांना शक्य तितक्या लवकर मदत मिळावी यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## नागरिकत्व तपासण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला, सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** 'एसआयआर ही घटनात्मक आणि कायदेशीर प्रक्रिया असून ती राबवण्याचा निवडणूक आयोगाला पूर्ण अधिकार आहे,' असे स्पष्ट करतानाच, 'मतदार म्हणून एखाद्या व्यक्तीची पात्रता ठरविताना एका मर्यादेपर्यंत नागरिकत्व तपासण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे,' असा निवाळी सर्वोच्च न्यायालयाने आज दिला.

एसआयआर प्रक्रिया व नागरिकत्व तपासणीच्या निवडणूक आयोगाच्या अधिकाराला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका या केवळ मतदान प्रक्रियेवर अवलंबून नसतात. मतदार यादीची शुद्धता आणि अचूकता हीदेखील निष्पक्ष निवडणुकीसाठी तितकीच महत्त्वाची असते. लोकशाही प्रक्रियेचा तो पाया आहे. तो पाया शाबीत राखण्यासाठी एसआयआर आवश्यक आहे,' असे न्यायालयाने नमूद केले.

**निकालातील ठळक मुद्दे**

- लोकशाही ही मतदानापुरती मर्यादित नाही, तर सरकार निवडण्याचा अधिकार कोणाला आहे हे ठरविणेदेखील लोकशाही प्रक्रियेत येते.
- निवडणूक आयोग कायद्याच्या चौकटीत राहून काम करत असेल तर केवळ नेहमीपेक्षा वेगळी कार्यपद्धती अवलंबली म्हणून एसआयआर रद्द करता येत नाही.
- एसआयआर लोकप्रतिनिधित्व कायदा व संबंधित नियमांचे उल्लंघन करत नाही.
- एसआयआरचा उद्देश मतदार यादी स्वच्छ व विश्वासार्ह करणे हा आहे. ही प्रक्रिया कठोर नाही.
- मतदार यादीतून नाव वगळले म्हणजे नागरिकत्व रद्द होत नाही योग्य मतदार कोण हे ठरविताना नागरिकत्वाशी संबंधित प्रश्न विचारण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. मात्र, हा अधिकार एखाद्याचे नाव मतदार यादीत ठेवायचे की नाही, इथपर्यंतच मर्यादित आहे. पुरेशा कागदपत्राअभावी एखाद्याचे नाव मतदार यादीतून काढले गेले म्हणून त्याचे नागरिकत्व रद्द होत नाही. निवडणूक आयोग यावर अंतिम निर्णय घेऊ शकत नाही. सक्षम अधिकारीच तो निर्णय घेऊ शकतात,' असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

**हा तर निवडणूक आयोगाला ब्लँक चेक - अॅड. प्रशांत भूषण**

निवडणूक आयोगाने राबवलेली एसआयआर प्रक्रिया वैध ठरवण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर देशातील कायदेतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी टीका केली आहे. 'सर्वोच्च न्यायालयाने पक्षपाती निवडणूक आयोगाला एक प्रकारे ब्लँक चेक दिला आहे. तुम्हाला वाटेल तसा एसआयआर करा असा संदेशच जणू दिला आहे. देशातील जवळपास 10 टक्के मतदारांची नावे मतदार यादीतून काढण्याच्या आयोगाच्या निर्णयालाही न्यायालयाने एक प्रकारे मान्यता दिली आहे. लोकशाहीसाठी आणि देशातील न्यायव्यवस्थेसाठी हा काळा दिवस आहे,' अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांनी दिली.

**मतदार कोण हे आता भाजप ठरवणार - योगेंद्र यादव**


एसआयआर प्रकरणात याचिकाकर्ते असलेले निवडणूक विश्लेषक योगेंद्र यादव यांनीही न्यायालयाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली. 'हा निकाल हादरवून टाकणारा आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत लोकशाही तत्त्वालाच पायदळी तुडवण्याची परवानगी दिली आहे. लोकशाहीमध्ये मतदार सरकारची निवड करतात. सरकार मतदारांची निवड करू शकत नाही. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निर्णयामुळे आता या देशात मतदान कोण करणार आणि कोण नाही हे भाजप ठरवू शकणार आहे,' अशी भीती योगेंद्र यादव यांनी व्यक्त केली.

**साडेसात कोटी मतदारांची नावं का वगळली? - काँग्रेसचा सवाल**

काँग्रेसचे प्रवक्ते व ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ अभिषेक मनू सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील विरोधाभासावर बोट ठेवले. 'नागरिकत्वाचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही. नागरिकत्वाशी संबंधित काही शंका असल्यास आयोग गृह मंत्रालयासारख्या सक्षम विभागाकडे हे प्रकरण सोपवू शकतो,' असे न्यायालय म्हणते. तसं असेल तर नागरिकत्वाचा अंतिम निर्णय होण्याआधी वेगवेगळ्या राज्यातील साडेसात कोटी मतदारांची नावे आयोगाने कशाच्या आधारे वगळली, असा सवाल त्यांनी केला.

## ‘चित्रपटांपेक्षा माणसांची 'होप' बनण्यातच खरे समाधान’- सोनू सूद

### मोहोळ तालुक्यातील मसलेचौधरी गाव दत्तक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चित्रपटांचे यश, पुरस्कार आणि बॉक्स ऑफिसचे आकडे महत्त्वाचे असले तरी एखाद्या सामान्य माणसाची आशा बनण्यात जे समाधान मिळते, ते कोणत्याही यशापेक्षा मोठे असते, अशी भावना अभिनेता व समाजसेवक सोनू सूद यांनी व्यक्त केली. सोलापूरातील पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी 'सोनू सूद चॅरिटी फाउंडेशन', 'उन्नती' उपक्रम, सामाजिक कार्य, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य आणि राजकारणातील प्रवेशाबाबत मनमोकळेपणाने भूमिका मांडली. कोविड काळात मजुरांना घरी पोहोचवण्यापासून सुरू झालेला प्रवास आज शिक्षण, वैद्यकीय मदत, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण विकासापर्यंत पोहोचल्याचे सांगताना सोनू सूद म्हणाले, ही लढाई एकट्याने जिंकता येत नाही. पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य लोकांच्या सहकार्यामुळेच हजारो लोकांपर्यंत मदत पोहोचवणे शक्य झाले.

**सध्या तरी राजकारणात जाण्याचा विचार नाही**

राजकारणात प्रवेशाबाबत विचारलेल्या प्रश्नावर सोनू सूद यांनी सध्या तरी कोणताही राजकीय विचार नसल्याचे स्पष्ट केले. राज्यसभेसह अनेक मोठ्या ऑफर्स आल्या मात्र सध्या समाजकार्यातून लोकांशी जोडलेले राहणे मला अधिक महत्त्वाचे वाटते, असे ते म्हणाले.सरकारसोबत सामाजिक प्रकल्पांमध्ये सहकार्य करण्यास आपण तयार असल्याचे सांगताना सोनू सूद म्हणाले, सरकारी यंत्रणांसोबत समन्वय साधून अनेक ठिकाणी शाळा आणि सुविधा उभारण्याचे काम केले आहे. सहकार्याने मोठे बदल घडवता येऊ शकतात.

यावेळी त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील 'उन्नती' प्रकल्पाची माहिती दिली. मोहोळ तालुक्यातील मसलेचौधरी गाव दत्तक घेतल्याचे सांगत, त्या गावात रस्ते, ड्रेनेज, वीज, शौचालये, आरोग्य आणि शिक्षण सुविधा उभारण्यावर भर दिला जाणार असल्याचे स्पष्ट केले. ग्रामीण शाळांमधील मूलभूत सुविधांचा प्रश्न गंभीर असल्याचे नमूद करताना ते म्हणाले, अनेक शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नसते. अशा छोट्या पण महत्त्वाच्या समस्यांवर काम करण्याची गरज आहे. सोलापूर आणि परिसरातील गरजू शाळांची माहिती दिल्यास मदतीचा प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले.

शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या मुलांच्या शिक्षणासाठीही फाउंडेशन कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. एका मुलाला शिक्षण दिल्यास त्याच्या पुढील पिढ्यांचे भविष्य बदलू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.आपण सर्वांनी मिळून काम केले, तर पुढील दहा वर्षांत हजारो लोकांचे आयुष्य बदलू शकतो, असा आशावाद व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेस चित्रकार विपुल मिरजकर, रूपल पांडे, मानसी, राहुल बऱ्हाणपूरकर आदी उपस्थित होते.

**मोकाट कुत्र्यांसाठी शेल्टर होमची गरज**

मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर बोलताना त्यांनी शेल्टर होमची गरज आहे. प्रश्न सोडवण्यासाठी केवळ महापालिका किंवा सरकारवर अवलंबून न राहता नागरिकांनीही सहभाग घेतला पाहिजे,असे त्यांनी नमूद केले.

## सोलापुरात शेतकऱ्यांचे बेमुदत ठिय्या आंदोलन तीव्र; प्रशासनाची विनंती धुडकावली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील गोकुळ साखर कारखान्याने शेतकऱ्यांचे जवळपास १३० कोटी रुपयांचे ऊस बिल थकविल्याने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत.

आपल्या हक्काच्या पैशासाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले बेमुदत ठिय्या आंदोलन चौथ्या दिवशीही तीव्रतेने सुरूच होते.

"शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर उसाची संपूर्ण थकीत रक्कम जमा होत नाही, तोपर्यंत एकही शेतकरी मागे हटणार नाही," असा आक्रमक इशारा आंदोलक शेतकऱ्यांनी दिला आहे. आंदोलनस्थळी दिवसभर घोषणाबाजी करत शेतकऱ्यांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, गुरुवार दि. २८ रोजी दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी आंदोलनस्थळी भेट देत शेतकऱ्यांशी जवळपास तासभर चर्चा केली. वाढते ऊन आणि आंदोलनातील त्रास लक्षात घेता वयोवृद्ध महिला व पुरुष शेतकऱ्यांना घरी पाठवण्याची विनंती त्यांनी आंदोलकांना केली. मात्र, संतप्त शेतकऱ्यांनी प्रशासनाची ही विनंती एकमुखाने फेटाळून लावत, "मागण्या मान्य होईपर्यंत वयोवृद्धांसह आंदोलन सुरूच ठेवणार," असा निर्धार व्यक्त केला.

या आंदोलनात अमोल पाटील यांच्यासह अरविंद घोडके, अंबादास शिवशंकर, सचिन जवळगे, प्रशांत सुरवसे, गणेश नरे, सचिन सपकाळ यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले आहेत.

**विविध संघटना व पक्षांचा वाढता पाठिंबा**

सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बेमुदत ठिय्या आंदोलनाला विविध पक्ष व संघटनांचा पाठिंबा वाढत आहे. दि. २७ रोजी संभाजी आरमार यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला होता. तर दि. २८ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मूलभूत हक्क संघर्ष समिती आणि अखिल भारतीय किसान सभा, सोलापूर यांनी आंदोलनस्थळी भेट देत पाठिंबा जाहीर केला. तसेच वंचित बहुजन आघाडीनेही तोंडी पाठिंबा दिल्याची माहिती आंदोलक शेतकऱ्यांनी दिली.

## संपादकीय

# कांदा कधी हसवणार?

रडवणे हा कांद्याचा नैसर्गिक गुण असला तरी हा कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र आपल्या चेहऱ्यावर हसू असावे अशीच अपेक्षा असते. पण गेल्या कित्येक वर्षाप्रमाणे यावर्षीसुद्धा कांद्याचा वांदा झाला आहे.

देशातील एक महत्त्वाचे पीक असलेला कांदा शेतर्कयांना हसवण्यापेक्षा जास्त रडवूच लागला आहे.

सरकारने नेहमीप्रमाणे कांद्याचा हमीभाव जाहीर केला असला, तरी तो कांदा उत्पादक शेतर्कयांना आणि विरोधी पक्षांना मान्य नसल्याने ठीकठिकाणी आंदोलनेही झाली. हा विषय केवळ महाराष्ट्राचा प्रश्न नाही. पण जगातील सर्वात मोठा कांदा उत्पादक देश असलेल्या भारतामध्ये महाराष्ट्र हे सर्वात मोठे कांदा उत्पादक राज्य असल्यामुळे कांद्याचा प्रश्न नेहमीच महाराष्ट्रात मोठा असतो.

काही वर्षांपूर्वी कांद्याच्या याच विषयामुळे दिल्लीतील एक सरकार गडगडले होते. त्याचे उदाहरण समोर असतानाही सत्ताधारी अद्यापही त्यापासून धडा घेत नाहीत आणि दरवर्षीच हा कांद्याचा प्रश्न निर्माण होत आहे.

कांदा हे जसे शेतर्कयांचे आवडते पीक आहे तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी तो आवडता मूलभूत खाद्यपदार्थ आहे. साहजिकच एकीकडे सर्वसामान्य नागरिकांना कमी दरात कांद्याचा पुरवठा करणे आणि दुसरीकडे कांदा उत्पादक शेतर्कयांना योग्य किंमत देणे या कात्रीमध्ये नेहमीच हा विषय अडकतो.

कधी कधी या कांद्याने शंभर, दीडशे, दोनशे असासुद्धा किलोचा भाव पाहिला आहे. तर कधी हा भाव दहा रुपयाच्या आतही आला आहे. मुळात सरकारने एक विशिष्ट हमीभाव जाहीर केल्यानंतर शेतकऱ्यांच्या कांद्याची खरेदी त्या भावाने करून ग्राहकांना उपलब्ध करून देणे आवश्यक असते.

पण सरकार जेव्हा एखादा निर्णय घेते तेव्हा त्याची अंमलबजावणीला इतका वेळ जातो की तोपर्यंत आपले कांदा पीक तसेच ठेवणे शेतर्कयाला शक्य होत नाही आणि मग मध्यस्थ व दलाल यांच्या घशामध्ये येईल त्या किमतीला आपले उत्पादन शेतर्कयांना विकावे लागते.

जोपर्यंत शेतकऱ्यांची साठवणूक क्षमता वाढत नाही तोपर्यंत सरकारने कितीही निर्णय घेतले तरी त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार नाही. सर्वसाधारणपणे भारताच्या शेती अर्थशास्त्राचा विचार करता एखाद्या वर्षी ज्या नगदी पिकाला भाव येतो, त्याच प्रकारचे नगदी पीक पुढच्या वर्षी घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. कांद्याबाबत नेहमी असेच होते. एखाद्या वर्षी कांद्याला चांगला भाव मिळाला तर बहुतांश शेतकरी कांदा पीकच घेतात आणि अर्थशास्त्राचा नियमाप्रमाणे जेव्हा पुरवठा वाढतो तेव्हा आपोआपच किंमत कमी होत असल्याने शेतकरी पुन्हा एकदा अडचणीत येतो.

या सर्व गोष्टींची कल्पना सरकारी यंत्रणांना असूनही दरवर्षी त्याच त्याच प्रश्नाचा विचार करून त्याच प्रकारची उत्तरे शोधण्याचा विषय समोर येत राहतो. या विषयावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा विचार कधीच केला जात नाही. कोणताही शेतकरी आपले जे पीक घेत असतो त्यापासून त्याला किमान उत्पन्न मिळावे आणि त्याला किमान तोटा तरी होणार नाही अशा प्रकारे धोरण राबवणे गरजेचे असताना शेतकरी नेहमीच आर्थिक संकटात का येतो याचाही शोध यानिमित्ताने घ्यायला हवा.

एखादे पीक घेताना जो संपूर्ण खर्च येतो, त्यामध्ये काही प्रमाणात नफा मिळावा अशा किमतीला आपल्या शेतमालाची विक्री होईल अशी आशा शेतकरी धरत असतो. पण अनेक वेळा उत्पादन खर्चापेक्षाही कमी किमतीला विक्री करावी लागत असल्याने तोटाच सहन करावा लागतो. कांदा पिकाबाबत तर अनेक वेळा दरवर्षी अशाच प्रकारच्या घटना घडताना दिसतात.

हमीभाव असो, निर्यात बंदी असो किंवा निर्यातीला परवानगी देण्याचा विषय असो, अशाच प्रकारची तीच तीच धोरणे राबवून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सुटणार नाहीत हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. खरे तर जगातील सर्वात मोठा कांदा उत्पादक देश भारत असल्याने आणि त्याच प्रमाणात भारतातून कांद्याची निर्यातही होत असल्याने अशा कांद्याचे पीक घेर्णाया शेतर्कयांची शेती नेहमीच फायदेशीर व्हावी अशीच अपेक्षा असायला हवी, पण दुर्दैवाने तसे होत नाही.

सर्वच पातळीवर धोरणामध्ये काहीतरी चुकीचे आखले जात असल्याने त्याचा फटका अखेर बळीराजालाच बसत असल्याचे दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाला आता बारा वर्षे पूर्ण होत आहेत. आपल्या कार्यकाळाच्या पहिल्याच वर्षांमध्ये नरेंद्र मोदी यांनी पाच वर्षांमध्ये शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट केले जाईल अशी घोषणा केली होती.

ती अद्याप प्रत्यक्षात आलेली नाही. आता सत्ताकारणाला एक तप पूर्ण झाल्यानंतर तरी मोदी सरकारने कांदाउत्पादक शेतकऱ्यांसह समस्त बळीराजाला दिलासा मिळेल अशाच प्रकारचे धोरण आगामी कालावधीमध्ये राबवणे अपेक्षित आहे.

पान १ वरून

## आम्हीही सत्तेमध्ये आहोत...

टेभुर्णीतील पदाधीकारी मेळाव्यात पदाधिकाऱ्यांचे चांगलेच कान खेचले. सोलापूर जिल्हातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना कोण दमबाजी करून गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असलीत तर आम्ही खपवून घेणार नाही असे स्पष्टपणे ठणकावून सांगताना मी जाण्यापूर्वी सर्व अधिकाऱ्यांना सूचना करून जाणार असल्याचे सांगितले. यावरून सोलापूर जिल्ह्यातील शिवसेना आणि भाजप यांच्यातील वाद आता पुन्हा समोर येऊ लागले आहे.

**आम्हीही सत्तेमध्ये असून नरेंद्र मोदी आणि अमित शहांच्या विचाराला पाठिंबा देत आहोत**

आम्हीही सत्तेमध्ये असून नरेंद्र मोदी आणि अमित शहांच्या विचाराला पाठिंबा देत आहोत. मात्र सोलापूर जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांना कोणी गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असेल तर ते आम्ही कधीही खपवून घेणार नाही असा इशारा उदय सामंत यांनी दिला. अशा गोष्टीने शिवसेना ना मोहरम होत नसते असा इशारा भाजपला दिला. या सर्व प्रकारातून सोलापूर जिल्ह्यात भाजप आणि शिवसेना यांच्यात सर्व काही आलबेल नसल्याचे समोर येत आहे.

दरम्यान, आज रात्रीपर्यंत जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात येईल. 17 विधान परिषदेच्या जागा आहेत आणि 17 च्या 17 जागा जिंकू असा विश्वास सामंतांनी व्यक्त केला. शेवटी शिंदे साहेबांसोबत चर्चा करू विषय सोडवू कोंकणात आमचे मतदार जास्त आहेत इथे राष्ट्रवादीने क्लेम केला आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत ह्या गोष्टी होत असतात आमचे नेते मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री मार्ग करण्यास सक्षम आहेत. चर्चा खूप होत असतात शेवटी जेव्हा आम्ही फॉर्म भरू तेव्हा तुमच्या तो आकडा लक्षात येईन असे सामंत म्हणाले.

# पर्यटन, सावधगिरी आणि जीवनाचा समतोल

कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या पोलादपूरझमहाबळेश्वर मार्गावरील आंबेनळी घाटात नुकतीच (२५ मे २०२६ रोजी) एक भीषण दुर्घटना घडली. सहलीवरून परतताना एक स्कॉर्पिओ गाडी तब्बल ८०० ते १००० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात सातारा जिल्ह्यातील आसगाव (कोरेगाव) येथील आठ तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

कोकणात पर्यटनासाठी अवघ्या महाराष्ट्रातून लोक जातात. कोकणाशी जोडणारे अंबा घाट, आंबेनळी घाट, भोर घाट, कुंभारली घाट हे सर्व घाट आणि त्यातून जाणारे रस्ते अत्यंत वळणावळणाचे व धोकादायक आहेत. या घाटांतून वाहन चालवणे म्हणजे वाहनचालकाच्या कौशल्याची खरी परीक्षा असते. अरुंद आणि वळणदार रस्त्यांवरून गाडी चालवताना अनुभवी चालकाचाही कस लागतो. एका बाजूला उंच डोंगर, तर दुसऱ्या बाजूला हजार ते दीड हजार फूट खोल दऱ्या — अशा परिस्थितीत वाहन चालवणे म्हणजे स्वतःचे कौशल्य पणाला लावणे होय.

आजकाल चारचाकी वाहनांची संख्या झपाट्याने वाढली आहे. लोकांनी महागड्या चारचाकी गाड्या विकत घेतल्या आहेत. गाड्या घेऊन लोक आता मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी बाहेर पडत आहेत. विशेषतः तरुण मंडळी मित्रांसह कोकण, गोवा, कर्नाटक, केरळ अशा ठिकाणी फिरण्यासाठी जात आहेत. मात्र, या तरुणांचे वाहन चालवण्याचे कौशल्य अनेकदा पूर्णपणे परिपक्व झालेले नसते. ड्रायव्हिंगमधील पुरेसा अनुभवही नसतो. अशा वेळी पर्यटनाचा आनंद घेणे चुकीचे नसले, तरी पुरेशी सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. स्वतःचे वाहण चालवण्याचे कौशल्य उत्तम नसेल तर सोबत ज्याने अनेक वेळा कोकणा सारख्या घाटरस्त्यांवरून वाहन चालवलेले आहे असा अनुभवी वाहनचालक सोबत घेऊन जाणे गरजेचे ठरते. कारण आपला जीव निश्चितच अधिक मौल्यवान आहे.

उन्हाळी सुट्टीत कोकणातील समुद्रकिनारे, छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, निसर्गसौंदर्य, तेथील विविध खाद्यपदार्थ आणि बाजारपेठा यांचे पर्यटन मनाला आनंद आणि समाधान देणारे असते. वर्षभराच्या कामाचा शिणवटा घालवण्यासाठी, हवाबदल म्हणून आणि दैनंदिन जीवनातील एकसुरीपणातून बाहेर पडण्यासाठी पर्यटन आवश्यकच आहे.पर्यटनामुळे नवीन भागातील लोकांचे जीवन, त्यांची बोलीभाषा, आहार, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा यांची ओळख होते. निसर्ग, मानवी जीवन, चालीरीती, परंपरा, खेळ आणि सामाजिक धारणा यांतील विविधता समजून घेता येते. दर दहा किलोमीटरवर माणसांचे जीवन किती बदलते, याची जाणीव होते. पर्यटनातून डोळसपणा मिळतो, निरीक्षणशक्ती वाढते आणि माणसामाणसांतील स्नेहसंबंध अधिक दृढ होतात.

प्रवास आणि अपघात यांमध्ये खबरदारीला फार महत्त्व असते. शेवटी, माणसाचे जीवन म्हणजे समतोलपणा होय. जीवनात अनेक गोष्टी आपण धोक्याचा विचार न करता करत असतो. काही गोष्टी मिळवण्यासाठी धोका पत्करावा लागतो. अनेक गोष्टींवर विजय मिळवण्यासाठीही धैर्य दाखवावे लागते. असा विजय म्हणजेच पराक्रम होय. पर्यटन आणि त्यातून स्वतःचे जीवन समृद्ध करण्यासाठी केलेला प्रवास हाही एका अथार्ने पराक्रमच आहे.

हे सारे खरे असले, तरी उत्तम वाहनचालक, प्रवासाला निघण्यापूर्वी वाहनाची पूर्वतपासणी, प्रवासादरम्यान मद्यपान टाळणे, यांसारख्या खबरदारीच्या गोष्टी पाळल्या, तर पर्यटनाचा आनंद सुरक्षितपणे घेता येतो. त्याचबरोबर वळणावळणाच्या घाटरस्त्यांच्या कडेला सुरक्षिततेचे मजबूत कठडे असणे आवश्यक आहे. जेवढा सुरक्षित आणि सावधगिरीने आपण प्रवास करू तेवढा आपल्याला पर्यटनाचा आनंद घेता येईल.



- **किशोर जाधव**, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# दर्जेदार शिक्षणासोबतच दर्जेदार निवासावर शासनाचा भर - मंत्री चंद्रकांत पाटील



**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी वसतिगृहामध्ये आधुनिक आणि सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. याच ध्येयाने राज्यातील विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त वसतिगृह उभारण्यावर शासनाचा मुख्य भर आहे, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

वांद्रे पूर्व येथील कलानगर परिसरात सुरू असलेल्या 'सर जे. जे. कला संस्था वसतिगृहाच्या' नव्या इमारतीच्या बांधकामाची मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पाहणी केली, आणि कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. या पाहणीदरम्यान त्यांनी बांधकामाची सद्यस्थिती, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधा तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली व काम वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

**नव्या वसतिगृहाची वैशिष्ट्ये आणि आधुनिक सुविधा :**

विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा आणि आरामदायी निवास लक्षात घेऊन या वसतिगृहाचे अत्यंत नेटके नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामध्ये प्रामुख्याने खालील सुविधांचा समावेश आहे:

प्रवेश क्षमता : या आधुनिक वसतिगृहामध्ये एकूण १००० विद्यार्थ्यांची (५०० विद्यार्थी आणि ५०० विद्यार्थिनी) निवास क्षमता असेल.

खोल्यांची रचना : वसतिगृहात एकूण ३६४ स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये मुलांसाठी १८२ आणि मुलींसाठी १८२ खोल्या राखीव आहेत.

खोलीतील सुविधा : प्रत्येक खोलीत तीन विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कॉट आणि कपाटाची सुविधा दिली आहे. तसेच प्रत्येक खोलीला स्वतंत्र प्रसाधनगृह (अटॅच बाथरूम) जोडण्यात आले असून त्यात गिझरद्वारे गरम पाण्याची सोय असेल.

इतर सोयी : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वसतिगृह परिसरात सुसज्ज वाचन कक्ष, व्यायामाळा, इनडोअर प्ले एरिया, डबल हाईट कॉमन रूम, वार्डन रूम आणि प्रत्येक मजल्यावर शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर फिल्टरची व्यवस्था करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आणि राहण्यासाठी उत्तम वातावरण मिळणे हा त्यांचा हक्क आहे. हे वसतिगृह मुंबईत शिकणाऱ्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी एक आधुनिक आणि सुरक्षित हक्काचे घर ठरेल,असेही मंत्री चंद्रकांत दादा म्हणाले.

या पाहणी दौऱ्याप्रसंगी तंत्र शिक्षण सहसचिव संतोष खोरगडे, अवर सचिव प्रवीण मुंढे, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, उपकला संचालक विनोद दांडगे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिनिधी आणि संबंधित उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.

# अमेरिकेतील रासायनिक अभियंता धीरजचा सोलापुरात गौरव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** घरची परिस्थिती साधी... परदेशी शिक्षणाचे मोठे स्वप्न... ना शासकीय मदत, ना शिष्यवृत्तीङ्क तरीही जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर सोलापूरच्या धीरज राज सुरते यांनी अमेरिकेत केमिकल इंजिनिअर म्हणून स्वतःची ओळख निर्माण करत कुटुंबासह शहराचे नाव उज्वल केले आहे. सोलापूरच्या सुपुत्राने वडिलांच्या कजार्ची, संघषार्ची यशातून परतफेड केली. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सुरतेझस्वामी परिवाराच्या वतीने आयएमए हॉल येथे भावनिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात गौरव समारंभ पार पडला.

यावेळी एआय इंजिनिअर म्हणून यश मिळविल्याबद्दल तन्मय राज सुरते याचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास जाईबाई सुरते, राज सुरते, योगिता सुरते, ॲड. नितीन स्वामी, ॲड. कालिंदी सुरतेझस्वामी, उमेश सुरते, वर्षा सुरते, डॉ. शैलेश सुरते, अनुराधा सुरते, सामाजिक कार्यकर्ते देवा उघडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातून धीरज सुरते यांनी मास्टर ऑफ सायन्स इन केमिकल इंजिनिअरिंग ही पदव्युत्तर पदवी संपादन केली. विशेष म्हणजे या संपूर्ण शैक्षणिक प्रवासात त्यांना कोणतीही शिष्यवृत्ती किंवा शासकीय आर्थिक मदत मिळाली नाही. तरीही मुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी वडील राज सुरते यांनी



स्वतःचा ट्रॅव्हल व्यवसाय, बँकेचे कर्ज आणि मित्रांच्या सहकार्याच्या जोरावर आर्थिक जबाबदारी पेलली.अडचणी, आर्थिक संकटे आणि अनिश्चिततेच्या सावटातही धीरज यांनी हार मानली नाही. दिवस-रात्र अभ्यास, अपार मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी अमेरिकेतील नामांकित मिशिगन विद्यापीठात शिक्षण पूर्ण केले आणि त्याच देशात प्रतिष्ठेची नोकरी मिळवत यशाचे शिखर गाठले, असे गौरवोद्गार उपस्थित मान्यवरांनी काढले.

संघर्षावर मात करून स्वप्न पूर्ण करणारा हा युवक आज अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. धीरजने केवळ आपल्या कुटुंबाचे नव्हे तर सोलापूरचेही नाव जागतिक स्तरावर पोहोचवले आहे, अशा भावना मान्यवरांनी आपल्या भाषणातून व्यक्त करत त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अविनाश मातंर्डे, संजय शिंदे, प्रा. डॉ. शीला हिरेमठ, देवा उघडे, पत्रकार किरण बनसोडे आदींनी शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागत ॲड. कालिंदी सुरते यांनी केले. प्रास्ताविक अनुराग सुतकर यांनी केले. सूत्रसंचालन राहुल बिराजदार यांनी केले तर सतीश शेंडगे यांनी आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी सर्व नातेवाईक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आणि वडिलांचे स्वप्न पूर्ण केले : धीरज सुरते**

वडिलांचे स्वप्न होते की मी परदेशात इंजिनिअर व्हावे. शिष्यवृत्ती मिळाली नाही तरीही न डगमगता वडिलांनी कर्ज काढून अमेरिकेत शिक्षणासाठी पाठविले. अडचणी आल्या पण खचलो नाही. अथक अभ्यास, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अमेरिकेत इंजिनिअर होऊन वडिलांचे स्वप्न पूर्ण केले. आजीसह सर्व कुटुंबियांचे पाठबळ मिळाले. त्यांच्या संस्कारामुळेच मी आज घडलो. इथपर्यंत आलो, अशी कृतज्ञतेची भावना सत्कारमूर्ती इंजिनीयर धीरज सुरते यांनी व्यक्त केली.

# मासिक पाळीतील समानता आणि सन्मानासाठी सीएसएमटी इमारत लाल रंगाच्या रोषणाईत उजळली

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** मासिक पाळी स्वच्छता दिन २०२६ निमित्त, अद्वैतेशा बिर्ला यांनी स्थापन केलेल्या आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा उपक्रम असलेल्या 'उजास'ने, मध्य रेल्वे मुंबईसोबत भागीदारी करून मुंबईतील प्रतिष्ठित छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) या ऐतिहासिक इमारतीला लाल रंगाच्या रोषणाईने उजळवले आणि 'मासिक पाळीची स्वच्छता हा हक्क आहे, विशेषाधिकार नाही,ह्व हा एक प्रभावी सार्वजनिक संदेश दिला.

हा उपक्रम अशा वेळी सुरू झाला आहे, जेव्हा मासिक पाळीचे आरोग्य आणि स्वच्छता व्यवस्थापन हा सन्मान, समानता, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्याचा एक मुद्दा म्हणून अधिकाधिक ओळखला जात आहे. घटनेच्या अनुच्छेद १४, १५ आणि २१ अंतर्गत सन्मान, समानता, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत हक्कांशी मासिक पाळीचे आरोग्य आणि स्वच्छता अविभाज्यपणे जोडलेली आहे, या सर्वोच्च न्यायालयाच्या मान्यतेमुळे या गतीला आणखी बळकटी मिळाली.

मासिक पाळीच्या स्वच्छतेबद्दलच्या जागृतीमध्ये भारताने प्रगती केली असली तरी, त्यात अजूनही मोठी तफावत कायम आहे. राष्ट्रीय आकडेवारीनुसार, भारतातील जवळपास चारपैकी एक तरुणी अजूनही मासिक पाळीच्या स्वच्छ पद्धतींपासून वंचित आहे. अभ्यासातून असेही दिसून आले आहे की, अनेक किशोरवयीन मुलींना पहिली मासिक पाळी येण्यापूर्वी त्याबद्दल माहितीच नसते, तर दुसरीकडे मासिक पाळीशी संबंधित कलंक, चुकीची माहिती आणि पोषक वातावरणाचा अभाव यांचा आत्मविश्वास, गतिशीलता आणि शाळेतील उपस्थितीवर परिणाम होत राहतो.



वंचित समुदायांमध्ये आणि शहरी अनौपचारिक वस्त्यांमध्ये ही विषमता अनेकदा अधिक स्पष्टपणे दिसून येते, जिथे मोठ्या महानगरांमध्ये राहत असूनही मुलींना गोपनीयता, जागरूकता आणि सामाजिक कलंक यांसारख्या आव्हानांचा सामना करावा लागतो. शहरी वस्त्यांमधील संशोधनातून हे देखील समोर आले आहे की मासिक पाळीच्या काळात शाळेतील गैरहजेरीचे प्रमाण जवळपास ३८% पर्यंत पोहोचू शकते, ज्यामुळे मासिक पाळीच्या आरोग्याविषयी सातत्यपूर्ण जागरूकता आणि सामुदायिक सहभागाची गरज अधोरेखित होते.

दररोज लाखो लोक ये-जा करत असलेल्या भारतातील सर्वात व्यस्त सार्वजनिक स्थळ आणि वाहतूक केंद्रांपैकी एकामध्ये हा संवाद आणून, उजास आणि मध्य रेल्वेने मासिक पाळीबद्दल अधिक दृश्यमान, मुख्य प्रवाहात चर्चांना प्रोत्साहन देण्याचा आणि या विषयाभोवती असलेल्या मौनाला आव्हान देण्याचा प्रयत्न केला.

बोलणे या प्रसंगी , आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा उपक्रम असलेल्या 'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्याः ह्वउजास आणि मध्य रेल्वे यांच्यातील सहकार्य हे मासिक पाळीच्या आरोग्याविषयीच्या संवादांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्व दर्शवते. मासिक पाळी हा विषय मौन, कलंक किंवा अस्वस्थतेमुळे मर्यादित असलेला संवाद म्हणून यापुढे राहू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाची मान्यता हे मासिक पाळीच्या आरोग्याला सन्मान, समानता आणि सुलभतेचा मुद्दा म्हणून स्वीकारण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. तथापि, मुली आणि महिला सुरक्षितपणे व आत्मविश्वासाने मासिक पाळी हाताळू शकतील हे सुनिश्चित करण्यासाठी, शाश्वत प्रगतीकरिता जागरूकता, शिक्षण आणि सामुदायिक सहभागामध्ये सतत प्रयत्नांची आवश्यकता असेल.'

पुढे बोलताना, मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी (CPRO) डॉ. स्वप्निल नीला म्हणाले: 'देशातील सर्वात मोठ्या सार्वजनिक सेवा नेटवर्कपैकी एक म्हणून, दररोज लाखो लोकांची वाहतूक करताना, भारतीय रेल्वेचा विश्वास आहे की सार्वजनिक संस्था आणि सार्वजनिक जागा सामाजिक जागरूकता आणि समावेशनाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उजाससोबतच्या या सहकार्याच्या माध्यमातून, मासिक पाळीचे आरोग्य आणि स्वच्छतेविषयी अधिक मोकळ्या संवादांना प्रोत्साहन देण्याची आणि महिला व मुलींसाठी अधिक माहितीपूर्ण व सहाय्यक वातावरण निर्माण करण्यास हातभार लावण्याची आम्हाला आशा आहे, जेणेकरून त्यांच्यातील क्षमता अधिक चांगल्या प्रकारे साकार होईल.'

आजपर्यंत, उजासने १२ लाखांहून अधिक लाभार्थ्यांवर प्रभाव टाकला आहे आणि संपूर्ण भारतात ४८ लाखांहून अधिक मासिक पाळी स्वच्छता उत्पादनांचे वितरण केले आहे. कार्यक्रमाच्या मूल्यांकनानुसार वर्तणुकीत मोजता येण्याजोगा बदल दिसून येतो, ज्यामध्ये मुलींमध्ये मासिक पाळीबद्दलच्या गैरसमजांना नाकारण्याच्या प्रमाणात ४८ टक्के-पॉइंटची वाढ, मासिक पाळीच्या आरोग्याविषयीच्या जागरूकतेत ३८ टक्के-पॉइंटची सुधारणा आणि मुलांमध्ये पौगंडावस्थेविषयीच्या जागरूकतेत ४४ टक्के-पॉइंटची वाढ यांचा समावेश आहे. हे सर्व, मासिक पाळीबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी मुली आणि मुले दोघांनाही सहभागी करून घेणाऱ्या, सर्वसमावेशक आणि समुदाय-आधारित मासिक पाळी आरोग्य शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करते.

राष्ट्रीय स्तरावर मासिक पाळीतील समानतेविषयीची चर्चा विकसित होत असताना, हा उपक्रम सातत्यपूर्ण जागरूकता, शिक्षण आणि सहयोगी कृतीचे महत्त्व अधोरेखित करतो, जेणेकरून मासिक पाळीच्या समस्येकडे मौन किंवा कलंक लावून नव्हे, तर सन्मान, आत्मविश्वास आणि समान संधीच्या माध्यमातून पाहिले जाईल.

## दु:खद निधन



सौ. मंगल भगवान गव्हाणे (वय 68) रा. पाटील प्लॉट बार्शी यांचे गुरुवार (ता. 28) दुपारी तीव्र हृदय विकारायच्या धाक्याने निधन. त्या लोकमतचे जेष्ठ पत्रकार भ. के. गव्हाणे यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्यात पती, एक मुलगा, चार मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.

शुक्रवार (ता. 29) सकाळी साडे सात वाजता (7:30) मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## वात्रटिका

### ई... ईबोला.

पुसट होत होत्या आठवणी
तोवर नवा अवतार आला...
युगांडा,कांगो येथे धुमाकूळ
आता इथंही घुसला इबोला...
नको तेच झाले, चिंता वाढली
आणि पुन्हा भय दाटले...
भर पडतेय आफवांची आणि
लॉंकडाऊनचे वारे सुटले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# उद्योगमंत्री सामंत यांचा शिवशंभु प्रेमी व शिवसैनिक यांच्या वतीने भव्य सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवसेना नेते व राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत हे सोलापूर दौऱ्यावर आले असता, सोलापुरातील शिवसेना कार्यकर्त्यांच्या भव्य मेळाव्यात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. 'शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा समिती', 'छात्रवीर प्रतिष्ठान', 'शिवछत्रपती सामाजिक संघटना' आणि सोलापूरच्या शिवसैनिकांच्या वतीने उदयजी सामंत साहेबांना छत्रपती संभाजी महाराज यांची भव्य मूर्ती आणि शाल देऊन अत्यंत उत्साहात सन्मानित करण्यात आले.



या सोहळ्याला शिवसेनेचे प्रमुख नेते व मा.खासदार राहुल शेवाळे, सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख तथा खासदार धैर्यशील माने, सोलापूरची लेक तथा खासदार ज्योतीताई वाघमारे, ज्येष्ठ नेते सिद्धराम म्हेत्रे, मार्गदर्शक अमोलबापू शिंदे,अमरजी पाटील, नगरसेवक प्रियदर्शन साठे तसेच शिवसेनेचे सन्माननीय नेते पदाधिकारी आदी प्रमुख नेत्यांची सन्माननीय उपस्थिती होती.

याप्रसंगी शिवसेनेचे खंदे कार्यकर्ते तथा संभाजी ब्रिगेड चे महानगराध्यक्ष शिरीष जगदाळे, ज्योतिबा गुंड, शिवराज विभुते आणि प्रशांतजी देशमुख यांच्यासह सोलापूर शिवसेना शहर व जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी आणि बहुसंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मेळाव्यादरम्यान उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सोलापूरच्या शिवसैनिकांशी संवाद साधत संघटनात्मक बांधणीवर भर दिला. तसेच, विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपत केलेल्या या आदराबद्दल त्यांनी सर्व कार्यकर्त्यांचे व शिवसैनिकांचे मनापासून आभार मानले. या कार्यक्रमामुळे सोलापूर शिवसेनेमध्ये एक नवा उत्साह संचारल्याचे पाहायला मिळत आहे.

# विद्यार्थिनींची सुरक्षा व वृक्षारोपण पर्यावरण संवर्धनाचा ठोस आराखडा लवकर मार्गी- संस्कुती सातपुते

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी भेट घेऊन मतदारसंघातील तसेच जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक व पर्यावरणीय विषयांवर सविस्तर चर्चा करून या बैठकीत प्रामुख्याने वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा एक ठोस आराखडा तयार करून त्याबाबत विशेष बैठक लावण्याविषयी चर्चा



व शालेय स्तरावर विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या गुड टच बॅड टच (सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श) या विषयावर व्यापक जनजागृती उपक्रम राबवण्याकरता स्वतंत्र बैठक आयोजित करण्याबाबत सकारात्मक संवाद झाला.या दोन्ही संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण विषयांवर मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला असून, हे दोन्ही विषय लवकरात लवकरच मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सभापती संस्कृती सातपुते यांना दिले.

# इंद्रजित पवारांचे निर्देश; शिवरायांचा पुतळा होणार अधिक आकर्षक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हाधिकारी निवासस्थानासमोरील जिल्हा परिषद उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे चारही बाजूंनी स्पष्ट व भव्य दर्शन होईल, अशी विशेष व्यवस्था तातडीने करण्यात यावी, असे निर्देश जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा अर्थ समिती सभापती इंद्रजित पवार यांनी दिले.

मंगळवारी झालेल्या अर्थ समितीच्या सभेत पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत आदेश दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत विविध आर्थिक व प्रशासकीय विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सभेच्या सुरुवातीला मागील सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. तसेच महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या नवीन शासन निर्णयांचे वाचन करण्यात आले. यानंतर मार्च २०२५ अखेरच्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या हस्तांतरण, अभिकरण आणि सेस योजनांच्या जमा-खचार्चा तपशीलवार आढावा घेण्यात आला.

विविध योजनांच्या निधी वापरासंदर्भात अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. तसेच उद्यानातील शिवरायांच्या पुतळ्याभोवती सुयोग्य नियोजन करून नागरिकांना सर्व बाजूंनी पुतळ्याचे दर्शन घेता येईल, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सभेला जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज सावंत, पूनम इंगवले, रेश्मा डोके, केराप्पा पांढरे, वित्त व लेखाधिकारी मीनाक्षी वाकडे, भाजप उत्तर तालुका अध्यक्ष संभाजी दडे, भाजप ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विनायक सुतार यांच्यासह सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

# पालखी मार्गाच्या कामात अडथळा
## दोघांविरुद्ध करमाळा पोलिसांत गुन्हा दाखल

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील राजूरी ते केम हद्दीमध्ये संत निवृत्तीनाथ महाराज पालखी परतीच्या मागार्चे ल्टअट अंतर्गत मागील 18 महिन्यांपासून काम सुरु आहे. याच अनुषंगाने वारंवार शासकिय रस्ता कामादरम्यान अडथळा निर्माण करून, सरकारी कामात हस्तक्षेप केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध, करमाळा पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी मेसर्स एल. एन. मालवीय इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेडमध्ये अभियंता म्हणून कार्यरत असलेले अनिलकुमार संभूनाथ तिवारी (वय 58) यांनी फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, करमाळा तालुक्यातील गट नं. 75, 76/1 व 76/2 परिसरात, HAM अंतर्गत राजूरी ते केम हद्दीमध्ये संत निवृत्तीनाथ महाराज पालखी मार्गाच्या रस्त्याचे काम सुरू आहे. 22 एप्रिल 2026 रोजी पाण्याच्या टाकीजवळ रस्ता काम सुरू असताना, भरत महादेव तळेकर व लक्ष्मण महादेव तळेकर यांनी 'ही जागा आमची असून आमच्या जमिनीतून रस्ता करू नका' असे सांगत काम बंद पाडल्याचा आरोप आहे.

फिर्यादीने, संबंधितांना शासन मान्यतेचे दिनांक व आदेश दाखविले. व त्याच शासन आदेशाप्रमाणे रस्त्याचे काम सुरू असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, त्यानंतर ही रस्त्यात मोठे खड्डे खोदून वाहतूक बंद करण्यात आली. 26 मे 2026 रोजी पुन्हा जेसीबीद्वारे काम सुरू करण्यासाठी पथक घटनास्थळी गेले असता, आरोपींनी जेसीबी ऑपरेटरला धमकावून काम बंद पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी तहसीलदारांनी देखील संबंधितांना समजावून सांगितले होते. परंतु त्यांचे देखील तळेकर यांनी ऐकले नाही. त्यामुळे करमाळा तहसिल कार्यालयाकडून ही पोलिसांत तक्रार दाखल करण्याबाबत, पत्र देण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, धमकी देणे आणि सार्वजनिक काम बंद पाडल्याप्रकरणी, भरत महादेव तळेकर व लक्ष्मण महादेव तळेकर यांच्याविरुद्ध, करमाळा पोलीसात भारतीय न्याय दंड संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मूर्ती वाटप व सत्कार संपन्न



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती, माढा तालुका यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१ वा जयंती उत्सव, मूर्ती वाटप कार्यक्रम तसेच नव-निर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक किशोर बापू सलगर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार रामराव वडकुते यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात धनगर समाजाच्या राजकीय सहभागावर भाष्य केले. धनगर समाज हा शब्द पाळणारा समाज असून समाजातील तरुणांनाही आता राजकारणात सक्रिय होण्याची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले. दीड कोटी लोकसंख्या असलेला हा समाज सत्तेत सहभागी होण्यासाठी प्रयत्न शील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी खासदार वडकुते यांनी आयोजक किशोर सलगर यांच्या कार्याचे विशेष कौतुक करत, अशा प्रकारचा उपक्रम महाराष्ट्रात प्रथमच होत असून तो समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. आगामी काळात किशोर सलगर यांना निश्चितच राजकीय बळ मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच रामभाऊ टकले यांच्या सहकायार्चाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सदर उपक्रमाचे कौतुक केले. शिंदे कुटुंबीय आणि भारतीय जनता पक्ष हा कायमच धनगर समाजासह सर्व मायक्रो ओबीसी समाजाच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिथे जिथे संधी उपलब्ध होईल, त्या ठिकाणी समाजातील होतकरू व तरुण नेतृत्वाला संधी दिली जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

यावेळी जिल्हा परिषद माजी सभापती शिवाजीराजे कांबळे, सोलापूर महानगरपालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे, नियोजन समिती सदस्य तथा भाजप माढा पश्चिम मंडल अध्यक्ष योगेश बोबडे आणि डॉ. शशिकांत तरंगे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य प्रतिभा खरात, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे यांचे प्रतिनिधी नागनाथ वाघे, पंचायत समिती उपसभापती प्रतिनिधी हनुमंत गिड्डे, पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी परमेश्वर खरात, दिलीप भोसले, मधुकर देशमुख, माणिक श्रीरामे, सचिन देशमुख, दादासाहेब देशमुख, अशोक मिस्किन, तानाजी गाडे, नागेश खटके, जितेंद्र गायकवाड, निवृत्ती तांबवे, संभाजी पाटील, पत्रकार सचिन होदाडे, सतीश काळे तसेच गावचे विद्यमान व माजी सरपंच, पदाधिकारी आणि शेकडो समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक किशोर सलगर यांच्यासह रामचंद्र आबा टकले, राजाभाऊ थोरात, तानाजी सलगर, कांतीलाल टेळे, अण्णासाहेब ठेंगल, धनाजी जवळगे, बळीराम टकले, केशव देवकते, लक्ष्मण पाटील, माणिक झिंजे, तात्यासाहेब कारंडे व अमोल देवकते यांनी विशेष सहकार्य केले.

# शासनाच्या आदेशाप्रमाणे म.न.पा शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश मिळावे - विष्णू कारमपुरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासन शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या अध्यादेशाप्रमाणे महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थी- विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करावे अशा मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने महानगरपालिका शिक्षणाधिकारी सहाय्यक आयुक्त डॉ.रत्नराज जवळगेकर साहेब यांना कामगार सेनेचे प्रदेश अध्यक्ष विष्णू कारमपुरी (महाराज)यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाद्वारे देण्यात आले.

मा सहाय्यक आयुक्त म.न.पा यांना देण्यात आलेल्या निवेदनात सोलापूर शहर हे गरीब कामगारांचे शहर असून कामगार वर्ग केलेल्या काबाड कष्टातून आपल्या पाल्यांना शिक्षण शिकवण्याचा प्रयत्न करतात त्यातून या महागाईच्या दिवसात त्यांचे जगणे कठीण झाले आहे या सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्र शासन इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत प्राथमिक शिक्षण शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय पोषाख पूर्ण वर्षभर टिकला पाहिजे या उद्देशाने शैक्षणिक संस्थांसाठी शालेय गणवेश वाटपाचे अध्यादेश काढले आहे या अध्यादेशात एकूण १४ सूचनांचा समावेश करण्यात आला आहे असून यातील सूचना क्रमांक ५ मधील उपसूचना क्रमांक क्ष या सूचनेत मोफत गणवेश योजनेअंतर्गत वाटप करण्यात येणारे गणवेश विद्यार्थी शाळेत नियमित परिधान करीत असल्याने शाळा व्यवस्थापन समितीने गणवेश खरेदी करताना कापड चांगल्या दजार्चे व विद्यार्थ्यांच्या शरीराला त्वचेला इजा न करणारे असल्याचे दक्षता घ्यावी तसेच सदर कापड 100% पॉलिस्टर नसावे याची खात्री करण्यात यावी असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

शासनाच्या आदेशावरून गणवेश वाटप करणे गरजेचे आहे कारण यापूर्वी शासनाकडून गणवेश वाटप करण्यात आले त्यावेळी रेडिमेड व्यापारांच्या मागणीनुसार शासनाने गणवेश वाटप बंद करून परत शालेय समितीकडे दिले आहे आणि शिक्षणाधिकारी यांना गणवेश वाटप शासनाच्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करण्यास पूर्ण अधिकार दिले आहे तरी माननीयानी सोलापुरातील महानगरपालिका शाळेतील प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी- विद्यार्थिनींना शासनाच्या आदेशाप्रमाणे गणवेश वाटप करण्यात यावे असे नमूद करण्यात आले आहे.

विष्णू कारमपुरी महाराजांच्या नेतृत्वाखाली निवेदन देणारा शिष्टमंडळात विठ्ठल कुराडकर रेखा आडकी गुरुनाथ कोळी सविता दासरी प्रसाद जगताप लक्ष्मीबाई मुल भारत देवकुळे, लक्ष्मीबाई गुठला आदींचा सहभाग होता.

# पहिल्या लग्नाची माहिती लपवली, दागिने-रोखीसह नववधू फरार

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील बावची येथे विवाहाच्या नावाखाली फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पहिल्या पतीपासून मुलगी असल्याची माहिती लपवून दुसरे लग्न लावून दिल्यानंतर नवविवाहित महिला तीन महिन्यांतच घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन फरार झाल्याची तक्रार मंगळवेढा पोलिसांत दाखल झाली आहे.

फियार्दी नामदेव जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिलेसोबत लग्न जमवून देण्यासाठी तब्बल ₹१.५० लाखांची रक्कम देण्यात आली होती. लग्नानंतर काही दिवस संसार सुरळीत सुरू असतानाच महिलेने आपल्या पहिल्या विवाहाची आणि त्या विवाहातून एक मुलगी असल्याची माहिती लपविल्याचे उघड झाले.

दरम्यान, संबंधित महिला घरातील दीड तोड्याचे सोन्याचे गंठण आणि रोख रक्कम घेऊन रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख येथे पलायन केल्याचा आरोप फियार्दीत करण्यात आला आहे. या प्रकरणी नववधूसह लग्न जमवून देणाऱ्या तिघांविरोधात मंगळवेढा पोलिस ठाण्यात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करत आहेत.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.

**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्‍या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 262

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 8 | 3 | | | | | |
| 4 | 9 | | 1 | | 7 | | 3 | 2 |
| | | 3 | 2 | 8 | 4 | | | 6 |
| | 6 | | | 1 | 5 | | | 8 |
| | 8 | | 7 | 6 | 3 | | 2 | 9 |
| 3 | | 4 | | | | | | |
| | | 1 | | 7 | | | 8 | 4 |
| 6 | 4 | | | | | 2 | | 7 |
| | 2 | | 5 | | | 6 | | 3 |

# ग्रामीण भागात ८ तास थ्री फेज वीजपुरवठा सुरू ठेवण्याची खा. प्रणिती शिंदे यांची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना निवेदन देत ग्रामीण भागात ६ तासांऐवजी ८ तास थ्री फेज वीजपुरवठा कायम सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. मंगळवेढा, पंढरपूर, मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात सध्या एम.एस.ई.बी.कडून ६ तास वीजपुरवठा करण्यात येत असल्याने शेतकरी व पशुपालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जनावरांच्या दुधाची धार काढण्यासाठी मशीन चालवणे, पाण्यासाठी मोटार सुरू करणे तसेच जनावरांच्या चाऱ्यासाठी कडबाकुट्टी मशीन चालविणे यासाठी अखंडित वीजपुरवठा अत्यंत आवश्यक असल्याचे



खासदार प्रणिती शिंदे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

ग्रामीण भागातील परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांच्या हितासाठी ६ तासांऐवजी ८ तास थ्री फेज वीजपुरवठा सुरू ठेवण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने आदेश देण्यात यावेत, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# नातेपुते पोलिसांची कामगिरी

## ४.५० लाखांची चोरी अवघ्या काही दिवसांत उघड

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या एका गंभीर चोरीच्या गुन्ह्याचा तपास करत नातेपुते पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे मोठी कामगिरी केली आहे. या गुन्ह्यातील आरोपीला तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशच्या सीमेवरून ताब्यात घेऊन चोरीला गेलेल्या रकमेपैकी ३,५०,००० रुपये हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

दिनांक ०५/०५/२०२६ रोजी फियार्दी मंगेश मुकुंद दीक्षित हे मालोजीराजे बँक, नातेपुते येथून ४,५०,००० रुपये काढून आपल्या मोटरसायकलवरून पंढरपूर रोडने जात असताना, दोन अनोळखी इसमांनी त्यांना 'तुमचे पैसे पडले आहेत' अशी थाप मारून लक्ष विचलित केले आणि त्यांच्या मोटरसायकलला अडकवलेली पैशाची पिशवी चोरून नेली होती. याप्रकरणी नातेपुते पोलीस ठाणे गुरनं 185/2026 भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.



गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून नातेपुते पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. सपोनी विशाल वायकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक राकेश लोहार व पोलिस अंमलदार रणजीत मदने यांनी सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली आणि संशयित आरोपींचा माग काढला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे, आरोपी अशोक मॉरिस (वय ३९ वर्षे, रा. एमएमडीए, माटूर, चेन्नई, तामिळनाडू) याला पोलिसांनी नेल्लोर (आंध्र प्रदेश) परिसरातून ताब्यात घेतले.

आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्यास बीएनएसएस (BNSS) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली.पोलिसांच्या सखोल चौकशीत आरोपीकडून चोरीतील ३,५०,००० रुपये रक्कम हस्तगत करण्यात यश आले आहे.या कारवाईमुळे नातेपुते परिसरात सक्रिय असलेल्या गुन्हेगारी टोळ्यांना मोठा चाप बसला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण श्री. अतुल कुलकर्णी सो, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. विजय कबाडे उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज श्री. संतोष वाळके यांचे मार्गदर्शनाखाली नातेपुते पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक श्री विशाल वायकर, पोसई सोनल मोरे सहा. पोलीस फौजदार देविदास धोत्रे पोलीस नाईक राकेश लोहार, पोलीस नाईक अमोल वाघमोडे, पोलीस अंमलदार / रणजीत मदने, पोलीस अंमलदार असलम शेख नातेपुते पोलीस ठाणे यांनी केली आहे.

# बार्शी कृषी विभागाची धडक कारवाई

## 7.52 लाखांचे बोगस उडीद बियाणे जप्त

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** कृषी विभागाने मोठी कारवाई करत नकली उडीद बियाण्यांचा साठा जप्त केला असून हजारो शेतकऱ्यांची संभाव्य फसवणूक टळली आहे. स्वराज कॉलनी परिसरातील एका गोडाऊनवर छापा टाकून तब्बल 384 बॅग बोगस बियाणे ताब्यात घेण्यात आले.



कृषी विभागाच्या तपासात संबंधित बियाणे हे नामांकित कंपनीच्या 'विश्वास' वाणाची हुबेहूब नक्कल करून विक्रीसाठी आणल्याचे समोर आले आहे. जप्त करण्यात आलेल्या बियाण्यांची एकूण किंमत 7 लाख 52 हजार 640 इतकी असून प्रत्येक बॅगची किंमत 1960 असल्याची माहिती देण्यात आली.

या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून संबंधितांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, कृषी विभागाने शेतकऱ्यांना बियाणे खरेदी करताना अधिकृत विक्रेत्याकडूनच खरेदी करण्याचे तसेच पक्के बिल घेण्याचे आवाहन केले आहे.

# अंगणवाडी, शाळा दुरुस्ती करणाऱ्या ठेकेदारांना झाडे लावणे बंधनकारक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील विकासकामांना पर्यावरण संवर्धनाची जोड देण्यासाठी जिल्हा परिषदेकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात आहे. अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या (पीएचसी) दुरुस्तीची कामे करणाऱ्या ठेकेदारांना आता वृक्षलागवड करणे बंधनकारक करण्याचा निर्णय जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समिती सभापती इंद्रजित पवार यांच्या पुढाकारातून आकार घेत आहे.

जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत देण्यात येणाऱ्या प्रत्येक वर्क ऑर्डरमध्ये संबंधित ठेकेदारांनी किमान पाच ते कमाल ५० झाडे लावावीत, अशी अट समाविष्ट करण्याची तयारी सुरू आहे. केवळ झाडे लावण्यावर न थांबता त्यांचे संवर्धन आणि प्रत्यक्ष



पडताळणीची जबाबदारीही निश्चित करण्यात येणार आहे.

अंगणवाडी, शाळा किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात उपलब्ध जागेचा विचार करून किती झाडे लावावीत हे ठरवले जाणार आहे. संबंधित अभियंत्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून वृक्षलागवडीचे फोटो ऑनलाइन अपलोड केल्यानंतरच ठेकेदारांची बिले मंजूर करण्याची अट घालण्याची तयारी सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

ग्रामीण भागात वाढते तापमान, घटती हरितपट्टी आणि पावसातील अनियमितता या पार्श्वभूमीवर विकासकामांसोबत पर्यावरण संवर्धनाची जोड देण्याचा हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे. सरकारी इमारतींच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड झाल्यास सावली, स्वच्छ हवा आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

विशेष म्हणजे, जिल्हा परिषद स्तरावर अशा प्रकारची अट प्रथमच लागू होत आहे. विकासासोबत पर्यावरण संरक्षण हा संदेश देणारा हा निर्णय ठरू शकतो, अशी प्रतिक्रिया पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांच्या या पुढाकारामुळे ग्रामीण भागात वृक्षलागवडीची व्यापक चळवळ उभी राहण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, विकासकामांमध्ये पर्यावरणपूरक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न म्हणून या निर्णयाकडे पाहिले जात आहे.

# स्वामीभक्तांचा गौरव आणि नामस्मरणाचा भक्तिमय सोहळा



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** नामस्मरणातून मनःशांती, आत्मबल आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते. स्वामींच्या चरणी श्रद्धा आणि सबुरी ठेवली तर प्रत्येकाच्या जीवनात चमत्कार घडतात. श्री स्वामी समर्थांच्या नामात जीवनातील संकटांवर मात करण्याचे सामर्थ्य आहे, असे प्रतिपादन श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी केले.

अधिक मासानिमित्त कोल्हापूर श्रीक्षेत्र अक्कलकोट श्री स्वामी समर्थ इच्छापूर्ती पदयात्रा सेवाभावी संस्थेच्या वतीने अभिवाडी (कोल्हापूर) येथील दत्त समर्थ सांस्कृतिक भवन येथे श्री स्वामी समर्थ नामस्मरण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुहास पाटील व सामाजिक कार्यकर्ते सत्यजित कदम यांच्या हस्ते महेश इंगळे यांचा मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. सुहास पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी उद्योजक नितीन वाडीकर, कृपासिंधू चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष संदीप पाटील, करवीर पंचायत समिती सदस्य रवींद्र पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात कोल्हापूर व परिसरात सामाजिक, सेवाभावी आणि आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामीभक्तांचा महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुहास पाटील यांनी इंगळे यांची प्रकट मुलाखत घेतली.

या मुलाखतीत इंगळे यांनी अक्कलकोट येथील वटवृक्ष देवस्थानाचे महत्त्व, श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अद्भुत लीला, नामस्मरणाची शक्ती आणि भक्तीमधील सातत्य याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर महाद्वार श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाच्या वतीने नामजप सोहळा संपन्न झाला.

यावेळी नारायण यादव, मनोज माने, रमेश माने, बेगू सुतार, यशवंत चव्हाण, प्रा. शिवशरण अनलेर, अंकुश केल, ज्ञानेश्वर भोसले आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# महारोजगार मेळाव्यास युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** रोटरी क्लब ऑफ सोलापूर, इक्विटास डेव्हलपमेंट इनिशियेटिव्ह ट्रस्ट व महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक 28 मे 2026 रोजी सोलापूर येथे महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सदर रोजगार मेळाव्यामध्ये सोलापूर येथील प्रिसिजन कॅमशाफ्ट, लक्ष्मी हायड्रोलिक प्रायव्हेट लिमिटेड, यशस्वी अकॅडमी स्किल, आहेरकर बजाज ऑटोमोबाईल्स, भागवत असोसिएट्स, पी. पी. पटेल मेटल पावडर प्रायव्हेट लिमिटेड, गुरुदत्त एंटरप्राइजेस, मोंढे उद्योग समूह आदी नामांकित कंपन्यांसह नजीकच्या जिल्ह्यातील विविध कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला. जिल्हा व जिल्हाबाहेरील मिळून एकूण 40 कंपन्या या मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या.

या मेळाव्यामध्ये दहावी पास/नापास, आयटीआय उत्तीर्ण, डिप्लोमा तसेच पदवीधर उमेदवारांसाठी विविध प्रकारच्या रोजगार संधी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सर्विस सेक्टर, बँकिंग सेक्टर, उत्पादन क्षेत्र, विमा कंपन्या, हॉस्पिटल्स, केमिकल उद्योग इत्यादी विविध क्षेत्रातील आस्थापनांचा या मेळाव्यात समावेश होता.

सदर रोजगार मेळाव्याचे उद्घाटन सोलापूरचे महापौर श्री. विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी सोलापूरातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल रोटरी संस्थेचे अभिनंदन केले.

रोटरीच्या अध्यक्षा सौ. धनश्री केळकर यांनी 'रोटरी करिअर कनेक्ट' या प्रकल्पाची घोषणा केली. तसेच महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूरचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी श्री. मनोज बिडकर यांनी उमेदवारांना सोलापूरमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध असून त्याचा लाभ घ्यावा व सोलापूरच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन केले.

या महारोजगार मेळाव्यासाठी 500 पेक्षा अधिक उमेदवारांनी नोंदणी केली होती.

सदर कार्यक्रमास रोटरीच्या अध्यक्षा सौ. धनश्री केळकर, सचिव निलेश फोफलिया, शिवाजी उपरे, सलाम शेख, शांता येळंबकर, निशांत डागा, आकाश बाहेती, संतोष कणेकर, ब्रिजकुमार गोयदानी, माजी प्रांतपाल झुबीन अमारिया आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी समन्वयातून प्रभावी यंत्रणा उभारा- प्रकाश आबिटकर

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाचे कठोर धोरण आहे. या कायद्याच्या व्यापक प्रसार, प्रचार व अंमलबजावणीत राज्य तपासणी व संनियंत्रण समितीच्या सदस्यांनी आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन करून समन्वयातून प्रभावी यंत्रणा उभारली जावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

आरोग्य भवन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्य तपासणी व संनियंत्रण समितीची बैठक झाली. बैठकीस आमदार स्नेहा दुबे, प्रधान सचिव निपुण विनायक, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक (विलटो) डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक डॉ. वैशाली बडधे व समितीचे सदस्य उपस्थित होते.

मंत्री आबिटकर म्हणाले, पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व संबधित यंत्रणांमध्ये योग्य



समन्वय निर्माण करून त्याचा उपयोग मूळ उद्देश साध्य करण्यासाठी करावा, यासाठी स्वतंत्र 'डेडिकेटेड टीम' आणि 'डेडिकेटेड यंत्रणा' नियुक्त करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. यासाठी ठरविलेली कार्यपद्धती प्रभावीपणे राबविणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री अबिटकर म्हणाले, समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याने लोकप्रतिनिधींनी आपल्या कार्यक्षेत्रात वेळ देऊन या मोहिमेत सहभागी झाल्यास या कामाला वेग येईल. यासाठी सर्वांनी जबाबदारीने योगदान द्यावे. समिती सदस्यांनी सुचवलेल्या सूचनांचा विचार केला जाईल, असेही मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

# बार्शीत इंग्रजी माध्यमाच्या नगरपालिका शाळेसाठी हालचाली वेगवान

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी शहरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण माफक फीमध्ये उपलब्ध व्हावे, या उद्देशाने माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी मंत्रालयात शिक्षण मंत्री दादा भुसे यांची भेट घेतली. शहरातील कुर्डुवाडी रस्त्यावरील ढगे मळा, सिद्धेश्वर नगर येथे बार्शी नगरपरिषदेच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या नगरपालिका शाळा क्रमांक २१ साठी इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत इंग्रजी माध्यमाची नवीन शाळा सुरू करण्यास स्वयंअर्थसहाय्य तत्त्वावर मान्यता देण्याची मागणी त्यांनी केली.

आजच्या स्पर्धात्मक युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व वाढत असून, बार्शी शहर व तालुक्यातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार शिक्षण मिळावे, या हेतूने राजेंद्र राऊत यांनी पुढाकार घेतला आहे. नगरपरिषदेच्या निधीतून एक एकर जागेत अत्याधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज अशी नगरपालिका शाळा क्रमांक २१ उभारण्यात आली आहे.

या शाळेत आधुनिक पॅटर्ननुसार शिक्षण दिले जाणार असून,



अतिशय माफक फी आकारण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील पालकांनाही आपल्या पाल्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देणे शक्य होणार आहे.

राजेंद्र राऊत यांनी मांडलेली भूमिका ऐकल्यानंतर शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी शिक्षण खात्याच्या सचिवांना यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याचे तात्काळ आदेश दिले आहेत.

मंत्र्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे लवकरच बार्शीतील विद्यार्थ्यांना आपल्या शहरातच आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाचे बार्शी शहर व तालुक्यातील पालक व विद्यार्थ्यांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल- मुख्यमंत्री फडणवीस

**नवी दिल्ली, (वृत्त सेवा):-** साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चर्चा झाली.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक



बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. राहुल आहेर, राहुल कुल, अभिमन्यु पवार, डॉ.विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सुहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, साखर आयुक्त संजय कोलते आदी उपस्थित होते.

साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे केंद्रीय मंत्री शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुर्नगठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' (किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य शासनाकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या नियार्तीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले.

नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दजार्चा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

# झेडपीत अध्यक्ष-उपाध्यक्षांची धडक तपासणी; कर्मचाऱ्यांची गैरहजेरी उघड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद प्रशासनातील शिस्त, स्वच्छता आणि कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी बुधवारी विविध विभागांना अचानक भेट देत धडक तपासणी केली. या पाहणीत अनेक विभागांतील अनियमितता, अस्वच्छता आणि कर्मचाऱ्यांची गैरहजेरी उघड झाल्याने अध्यक्ष व उपाध्यक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच अनुपस्थित कर्मचाऱ्यांना तातडीने नोटिसा बजावण्याचे आदेश संबंधित विभागप्रमुखांना देण्यात आले.

पाहणीची सुरुवात रेकॉर्ड विभागापासून करण्यात आली. या विभागात दप्तर, फायली, टेबल-खुर्च्या तसेच कपाटे अस्ताव्यस्त अवस्थेत पडलेली दिसून आली. रेकॉर्ड व्यवस्थापन अत्यंत ढिसाळ असल्याचे निदर्शनास आल्यानंतर अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी संताप व्यक्त केला. 'या विभागाची जबाबदारी नेमकी कोणाकडे आहे?'

अशी विचारणा त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांकडे केली.



मात्र संबंधित कर्मचाऱ्यांना समाधानकारक माहिती देता आली नाही. अध्यक्ष व उपाध्यक्षांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यात कर्मचारी अपयशी ठरल्याने संबंधित विभागप्रमुखांना तातडीने बोलावण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यानंतर प्राथमिक शिक्षण विभागाची पाहणी करण्यात आली. या विभागात सर्वत्र अस्वच्छता, सांडलेले पाणी आणि रिकाम्या खुर्च्या आढळून आल्या. अनेक कर्मचारी आपल्या टेबलवर अनुपस्थित असल्याचे दिसून आले. याबाबत शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे विचारणा करण्यात आली असता काही कर्मचारी बाहेर गेले असून काही जेवणासाठी गेले असल्याचे सांगण्यात आले. तसेच काही कर्मचारी रजेवर असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. मात्र त्यांच्या रजेची कोणतीही अधिकृत नोंद अथवा पुरावा तत्काळ उपलब्ध करून देता आला नाही.

त्यानंतर माध्यमिक शिक्षण विभाग तसेच आरोग्य विभागाच्या कार्यालयाचीही झाडाझडती घेण्यात आली. विविध विभागांतील कामकाज, उपस्थिती नोंदी, स्वच्छता आणि प्रशासनिक शिस्त यांची सखोल पाहणी करण्यात आली.

नागरिकांना वेळेत आणि पारदर्शक सेवा मिळावी, यासाठी प्रशासनातील शिस्तभंग सहन केला जाणार नाही, असा इशाराही अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी यावेळी दिला.